**<u>शपथेवर पुढील उलटतपास तक्रारदारातर्फे ॲड. डी. बी. गावंडे</u>**

हे म्हणण खर आहे की शाळेकडुन कर्मचारी आल्यावर जर संबंधीत कर्मचारी गैरहजर असतील तर त्यांना दुस–या दिवशी देखील बोलाविता येते. हे म्हणण खर आहे की याप्रकरणी संबंधीत कर्मचा–याला दुस–या दिवशी बोलविले नव्हते.

**<u>प्रश्न</u>** : कपाटामधील अभिलेख ताब्यात घेण्यापूर्वी तक्रारदाराला बोलाविण्यात आलं नव्हत हे खर आहे काय ?

**<u>उत्तर</u>** : त्या दिवशी तक्रारदार रजेवर होते.

हे म्हणण खर आहे की तात्काळ काम असेल तर कर्मचा–याला रजेवर असला तरी देखील बोलाविता येते. तसं लेखी पत्र तक्रारदार यांना हजर राहण्याकरीता दिल नव्हतं. हे म्हणण खर नाही की तक्रारदाराच्या ताब्यातुन काय अभिलेख मिळाला याबाबत पंचनामा केला नव्हता. याप्रकरणी तसा पंचनामा दाखल केला नाही. हे म्हणण खर नाही की तसा पंचनामा केला नव्हता त्यामुळे तो याकामी दाखल केलेला नाही. हे म्हणण खर आहे की तक्रारदाराच्या ताब्यातील अभिलेख घेताना सोबत असणा–या कर्मचा–यांचा जबाब देखील घेतलेला नाही. तो अभिलेख माझ्या ताब्यात ठेवला होता. हे म्हणण खर नाही की संबंधीत विद्यार्थ्याला चुकीच्या गुणपत्रिकेचा लाभ देण्याकरीता तक्रारदाराच्या ताब्यातुन अभिलेख घेतल्यानंतर त्यात मी खाडाखोड केली. हे म्हणण खर नाही की तक्रारदाराच्या ताब्यातुन घेतलेला अभिलेख नियमानुसार तयार करण्यात आला होता. हे म्हणण खर आहे की याप्रकरणी मी स्वत: प्राथमिक चौकशी केलेली नव्हती. हे म्हणण खर आहे की त्यामुळे प्राथमिक अहवाल दाखल केलेला नाही.

हे म्हणण खर नाही की सदरच प्रकरण हस्तांक्षर तज्ञांकडे पाठविण्यात आल्याच मी खोट सांगत आहे. मला आता नि.क्र.४३ सोबत अनुक्रमांक २८ वर दाखल गुणपत्रीकेची छायांकीत प्रत दाखविली. ती माझ्या

सहीने व कार्यालयाच्या शिक्क्याने देण्यात आलेली आहे. ती **नि.क.सी-४२** वर आहे. हे म्हणण खर नाही की मुळ नोटीफीकेशन न पाहता व मार्कशिटचा कच्चा मसुदा न पाहता सदर विद्यार्थ्यास मी खोटी गुणपत्रीका दिली. हे म्हणण खर नाही की सदर गैरकृत्य लपविण्याकरीता तक्रारदारास जबाबदार धरण्याचा प्रयत्न केला.

हे म्हणण खर नाही की माझ्या सरतपासाच्या परिच्छेद क्र. ११ मध्ये नमुद केलेला संपुर्ण मजकुर खोटा आहे. हे म्हणण खर नाही की संबंधीत विद्यार्थी किंवा पालक यांना गुणपत्रिका कोणाकडुन मिळाली याबाबत त्यांचा जबाब नोंदविलेला नाही. मला हे सांगता येणार नाही की तसा जबाब याकामी दाखल केला आहे काय? हे म्हणण खर आहे की जे कोणते जबाब या प्रकरणी घेण्यात आले असतील त्यावर तक्रारदाराची समक्ष म्हणून सही घेतलेली नाही.

हे म्हणण खर नाही की तक्रारदार दिनांक ०६/०८/२००७ पासुन दिनांक २७/०८/२००७ पर्यंत अनाधिकृतरित्या गैरहजर होते हे मी खोट सांगत आहे. हे म्हणण खर आहे की कर्मचारी अनाधिकृतरित्या गैरहजर असल्यास त्याला नोटीस दिली जाते. तशी नोटीस तक्रारदारास दिलेली नव्हती. ती का दिली नाही त्याच कारण मला आठवत नाही.

**प्रश्न** : या प्रकरणी झालेल्या कथित गैरव्यवहाराबाबत कारवाई व्हावी म्हणून सहसचिव या नात्याने कोणत्याही कर्मचा-याविरूध्द प्रस्ताव पाठविला नाही हे खर आहे काय ?

**उत्तर** : तसे अधिकार अध्यक्षाना आहेत सहसचिवाना नाहीत. तसा प्रस्ताव सहसचिव म्हणून पाठविला नाही.

हे म्हणण खर नाही की अभय गणपत आडे यांना गैरमार्गाने मदत करण्याकरीता तक्रारदाराने खाडाखोड केली हे मी खोट सांगत आहे. अभिलेख सिलकरून ठेवल्याबाबत पंचनामा वगैरे करण्यात आला नव्हता. हे

म्हणण खर आहे की तात्काळ वरीष्ठांना गैरप्रकाराची माहिती कळविली नव्हती. (साक्षीदार स्वत:हुन सांगतात की दोन दिवस सुट्‌टी होती).

हे म्हणण खर आहे की तक्रारदाराला खाडाखोड करतांना मी प्रत्यक्ष पाहील नाही. या प्रकरणी साक्ष देण्याकरीता मला या न्यायालयाचे समन्स आलेल नाही. या प्रकरणातील आरोपपत्राची तारीख मला आठवत नाही. मला हे सांगता येणार नाही की तसं कोणतही आरोपपत्र याप्रकरणी दाखल केलेल नाही. मला आरोपपत्राबाबत माहिती आहे. मला हे सांगता येणार नाही की आरोपपत्र, साक्षीदारांची यादी, जबाब वगैरे असणारा संच याकामी दाखल नाही. हे म्हणण खर नाही की त्यामुळे मी कोणत्या प्रकरणी साक्ष देण्यात आलो हे सांगु शकत नाही. हे म्हणण खर नाही जोडपत्रामध्ये साक्षीदार म्हणून नाव नसतांना केवळ माझ्याविरूध्दचा ठपका दुर व्हावा म्हणून तक्रारदारा विरूध्द मी साक्ष देण्याकरीता आलो. हे म्हणण खर आहे की तृतीय श्रेणी कर्मचा-यांना आरोपपत्र देण्याचा अधिकार राज्य बोर्डाच्या अध्यक्षांना आहे. हे म्हणण खर नाही की याप्रकरणी राज्य बोर्डाच्या अध्यक्षांनी कोणतही आरोपपत्र दिलेल नाही. हे म्हणण खर नाही की कथित खाडाखोड तक्रारदाराने केलेली नाही. हे म्हणण खर आहे की मी सचिव म्हणून संबंधीत कालावधीत कार्यरत होतो. हे म्हणण खर आहे की कार्यालयातील पत्रव्यवहार कार्यालय प्रमुखाच्या सहीने केला जातो.

हे म्हणण खर नाही की वाणिज्य कनिष्ठ महाविद्यालय, यवतमाळ यांचे प्रतिनिधी मंडळाच्या कार्यालयात आले होते हे मी खोट सांगत आहे. मला आता नि.क्र. ५८ चा प्राथमिक चौकशी अहवाल दाखविला. त्यामध्ये नमुद क्रिडा संचालकांचा अहवाल मागविल्याबाबत पत्र याकामी दाखल आहे काय हे मला सांगता येत नाही. हे म्हणण खर आहे की त्रुटी असणारे प्रस्ताव सोडुन इतर प्रस्ताव मंजुर करण्यात आले होते. हे म्हणण खर आहे की त्रुटी असणा-या प्रस्तावासंदर्भात मार्गदर्शन मागविण्यात आल होत. हे म्हणण खर नाही की एकदा प्रस्ताव निकाली काढल्यानंतर पुन्हा

त्याच प्रस्तावावर निर्णय घेण्याच कारण उरत नाही. हे म्हणण खर आहे की निकाली काढलेले प्रस्ताव पुन्हा फेरविचार करण्याबाबत मला वरीष्ठांनी निर्देश दिले नव्हते. हे म्हणण खर आहे की कोणत्याही विद्यार्थ्याचा प्रस्तावाचा फेरविचार करावा म्हणून तक्रार नव्हती. हे म्हणण खर नाही की त्यामुळे मी स्वतःच सदरचे प्रस्ताव पुन्हा विचारासाठी घेतले. हे म्हणण खर नाही की क्रिडा संचालकाच कोणतेही मार्गदर्शन नसतांना सदर प्रस्ताव पुन्हा विचारात घेतले. हे म्हणण खर नाही की पुणे संचलनालयाने कोणतेही निर्देश दिलेले नसल्याने ते याप्रकरणी दाखल केलेले नाही. ते का दाखल केलेले नाहीत याचे कारण मी सांगु शकत नाही. हे म्हणण खर आहे की दिनांक १४/०९/२००७ रोजीच नि.क्र. ६१ च पत्र देतांना मी सचिव पदावर कार्यरत नव्हतो. ते पत्र मी सचिव म्हणून दिलेल नाही. ते सचिव साहेबांनी दिलेल आहे.

ऑगष्ट २००७ मध्ये मी सचिव पदावर नव्हतो. हे म्हणण खर आहे की त्यामुळे विभागीय सचिव म्हणून निर्णय घेण्याचा अधिकार मला नव्हता. मला आता नि.क्र. ६५ च पत्र दाखविल. विभागीय सचिव म्हणून निर्णय घेण्याचा अधिकार मला नव्हते. मला आता नि.क्र.७२ च पत्र दाखविलं. त्यामध्ये प्रस्ताव श्री आडे, शेळके, पेठे, यांनी कंट्रोल असिस्टंट श्री थारोत यांच्या नियंत्रणाखाली केल्याच नमुद आहे. हे म्हणण खर आहे की त्याबाबत त्या सर्व कर्मचा-यांना खुलासा मागितला होता. हे म्हणण खर आहे की त्या सर्व कर्मचा-यांवर कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही. (साक्षीदारास नि.क्र. ७१ साक्षीदारास दाखविले.) त्यापत्राव्दारे श्री शेळके यांना खुलासा मागविण्यात आला होता. हे म्हणण खर आहे की त्यामधील पान क्र. २ वरील परिच्छेद क्रमांक २ मध्ये नमुद मजकुर खरा असल्यामुळे काहीही कार्यवाही केलेली नाही.

(साक्षीदारास निक्र. ७३ दाखविण्यात आले.) मला हे सांगता येणार नाही की ज्या टिपणी आधारे तो तक्ता तयार करण्यात आला ती

टिपणी याकामी दाखल केलेली नाही. नोटीफीकेशन व क्रिडा प्रस्ताव यांचे अवलोकन करून सचिव गुणपत्रिकेवर सही करतात. ते नोटीफीकेशन झाल्यानंतर गुणपत्रिका तयार केली जाते. हे म्हणण खर आहे की नोटीफीकेशन, प्रस्ताव किंवा टिपणी यांच्यामध्ये तफावत आढळल्यास सचिव गुणपत्रिकेवर सही करीत नाहीत. हे म्हणण खर नाही की मी तशी कोणतीही पाहणी न करता गुणपत्रिका दिलेली आहे. हे म्हणण खर आहे की सर्व अभिलेखाची पाहणी करून गुणपत्रिका देण्याचे अधिकार फक्त सचिवाना आहेत. हे म्हणण खर नाही की तक्रारदारांना खोटया प्रकरणात गोवण्याकरीता खोटी साक्ष देत आहे. हे म्हणण खर नाही की क्रिडा गुण सवलतीची प्रक्रीया मी स्वत: नियमानुसार राबविली नाही. मला हे नक्की सांगता येणार नाही की पाच जिल्हयांमधुन १५० प्रस्ताव त्यावेळी नामंजुर करण्यात आले होते. हे खर आहे की त्यावेळी सदर प्रस्ताव फेरविचाराकरीता घेण्यात आले होते. हे म्हणण खर आहे की सदरचे प्रस्ताव चार ते पाच अधिका-याच्या हाताखालुन जातात. हे म्हणण खर नाही की कोणतीही माहिती नसतांना तक्रारदारास खोटया प्रकरणात गोवण्याच्या दृष्टीने मी खोटी साक्ष देत आहे.

**पुर्नतपासणी : नाही**.

R.O.A.C.

sd/-

दिनांक ०१/०१/२०२२
अमरावती

( एम. एम. शेख )
न्यायाधीश,
कामगार न्यायालय, अमरावती.